# वार्ता टिपण दि.१२/०८/२०१७

## बनावट निवडणुक कार्ड (वोटर कार्ड) तयार करणारे व त्याव्दारे पॅनकार्ड तयार करणा-या इसमांना गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड,दक्षिण विभागाने केले जेरबंद

पुणे शहर गुन्हेशाखे कडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागा मध्ये कार्यरत असणारे पोनिरी राम राजमाने व त्यांचा स्टाफ असे दि.११/०८/२०१७ रोजी पुणे सातारारोडवर पेट्रोलींग करीत असताना **पोलीस नाईक रमेश चौधर** यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, इसमनामे सुनिल बारवकर हा कॉन्ट्रक्ट बेसीसवर जिल्हाधिकारी कार्यालय याठिकाणी निवडणुक विभागात मतदान कार्ड (वोटर आयडी) मिळण्या करीताचें अर्जाचे डेटा इंन्ट्री ऑपरेटर म्हणुन काम पाहत होता, त्याने मित्र गणेश शिळीमकर याचे सांगणेप्रमाणे त्याचे लॅपटॉपवर उपलब्ध मुळ निवडणुक ओळखपत्र (वोटर आयडी कार्ड) पेस्ट करुन त्यामध्ये इंग्रजी अध्याक्षर सिरीयल मध्ये/सिरीयल नंबर मध्ये फेरफार करुन त्यावर गणेश शिळीमकर याने दिलेले नावे टाकुन व फोटो स्कॅन करुन पेस्ट करुन बनावट हुबेहुब निवडणुक ओळखपत्र तयार करुन त्यांच्या प्रिटं काढुन, त्यावर निवडणुक आयोगाचा जुन्या ओळखपत्रांचा होलोग्राम चिटकवुन तसेच ऑफिस मधिल निवडणुक विभागातील चोरलेल्या शिक्यांचा वापर त्याचा साथीदार नामे रविंद्र जगताप याचेकरवी मतदान नोंदणी अधिकारी यांचे सहीचा शिक्का व हडपसर विधानसभा संघ यांचा गोल शिक्का मारुन व ती कार्ड लॅमिनेशन करतात व सदरचे कार्ड गणेश शिळीमकर यास आयकर विभागाचे पॅनकार्ड काढणेसाठी फोटो आयडी पुरावा देण्यासाठी वापरतात व सदर कामाचे बदल्यात गणेश शिळीमकर हा त्यांना वेळोवेळी रोख रक्कम देतो.सदरचे इसम काहीवेळात तीन हत्ती चौक,धनकवडी पुणे येथे इसमनामे गणेश शिळीमकर याचेसोबत बनावट निवडणुक ओळखपत्र,पॅनकार्ड देवाण घेवाण करण्याकरीता येणार आहेत, वगैरे मजकुरची बातमी मिळाल्याने सदरबाबत वरिष्ठांना फोनवर माहिती देवुन त्यांचे परवानगीने नमुद बातमीचे ठिकाणी सापळा लावुन त्यास जागीच पकडण्यात आले आहे. सदर इसमांची नाव-पत्ते पुढीलप्रमाणे गाडी चालविणारा १)रविंद्र हरिभाऊ जगताप वय ३६ वर्षे रा.सर्वे.न. ३६/४ केशवनगर,धनकवडी,पुणे,मागे बसलेला २) सुनिल मुरलीधर बारवकर वय ३१ वर्षे रा. सर्वे.न. ३६/३,नवनाथनगर,धनकवडी,पुणे, उभा असलेला इसम ३) गणेश जगन्नाथ शिळीमकर वय ३४ वर्षे रा.विजयानगर सोसा, बि.नं.७,प्लॅट नं. ५, वडगाव –धायरी,पुणे यास पकडुन त्यांचे ताब्यातुन एकुण १० बनावट निरनिराळया नावाचे निवडणुक ओळखपत्र (वोटर आयडी कार्ड) व पॅनकार्ड, एक अॅव्हेंजर मो.साय. तीन मोबाईल फोन, असा माल मिळुन आल्याने यांचे विरुध्द सहकारनगर पो.ठाणे गु.र.न.२४३/२०१७ भा.द.वि.क.४२०,४६७,४६८,४७१,४७३, ४७४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला असुन त्यांना गुन्हयाचेकामी **दि.११/०८/२०१७ रोजी २३/३० वा** अटक करणेत आलेली आहे.

तसेच मतदान नोंदणी अधिकारी यांचे सहीचा शिक्का व हडपसर विधानसभा संघ यांचा गोल शिक्के असे एकुण ३ शिक्के व एक डेल कंपनीचा लॅपटॉप असा **एकुण कि.रु.१,०५०००/- चा एकुण मालजप्त** करणेत आलेला आहे.

सदरची कामगिरी गुन्हेशाखा,पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री.सुधीर हिरेमठ सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.सुरेश भोसले सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने,पो.उप.निरी.श्री.उत्तम बुदगुडे सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान,रविंद्र कदम, पो.हवा. सुनिल चिखले, गणेश साळुकें,संजय बरकडे, अजय उत्तेकर पो.कॉ.कैलास साळुंके,रमेश चौधर,राकेश खुणवे,प्रविण पडवळ,विवेक जाधव,व चालक गंगावणे यांनी केली आहे.